15-06-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 14-06-2025 22:31 Page 1



दुर्गंधी आणि अस्वच्छतेने भरले मडगाव मासळी मार्केट पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com




२७ वर्षांनंतर दक्षिण आफ्रिका आयसीसी चॅम्पियन पान ४ वर

वेर्णा, रविवार, १५ जून २०२५ । पाने ४ । ₹ ४

। REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 । Volume 13, Issue 283 । Verna, । facebook.com/dainikherald । Sunday 15 June 2025 । Pages 4 । ₹ 4

## निवडक

### तीन महिलांसह चार नक्षलवाद्यांचा एन्काउंटर

**नवी दिल्ली, दि. १४ :** गेल्या काही महिन्यांपासून नक्षलवादी आणि पोलिसांमध्ये मोठ्या चकमकी पाहायला मिळत आहेत. आज पुन्हा एकदा पोलीस आणि नक्षलवाद्यांमध्ये मोठी चकमक झाल्याचे समोर आले आहे. मध्य प्रदेशातील बालाघाट येथे पोलिस आणि नक्षलवाद्यांमध्ये झालेल्या या चकमकीत चार नक्षलवादी ठार झाले. त्यापैकी तीन महिला आहेत. याबाबत सविस्तर माहिती अशी की, मध्य प्रदेशातील बालाघाट येथे पोलिस आणि नक्षलवाद्यांमध्ये झालेल्या या चकमकीत चार नक्षलवादी ठार झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यापैकी तीन महिला आहेत. कान्हा किसली राष्ट्रीय उद्यानातील मुक्की परिसरात ही चकमक घडली. पोलिसांनी चार नक्षलवाद्यांचे मृतदेह ताब्यात घेतले आहेत. तसेच काही नक्षलवादी जखमी होऊन जंगलात लपले असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. ही चकमक पोलिसांसाठी एक मोठे यश आहे. ठार झालेल्या तीन नक्षलवाद्यांची ओळख पटली आहे. त्या सर्वांची ओळख आशा, प्रमिला आणि करिश्मा अशी झाली आहे, त्या कान्हा भोरंडिओ दलाच्या सक्रिय सदस्या आहेत. चौथ्या नक्षलवाद्याचे नाव अद्याप समजलेले नाही.

---

### तर लवकरच पेट्रोल १५० रु. लिटर दराने मिळणार?

**तेल अवीव, दि. १४ :** इस्रायलने इराणमधील अणू ठिकाणांवर हवाई हल्ले केल्याचा मोठा आर्थिक फटका सर्वसामान्य भारतीयांना बसू शकतो असे सांगितल्यास तुम्हाला नक्कीच आश्चर्य वाटेल. मात्र हे खरे आहे. इस्रायलने इराणवर हल्ला केल्याने जागतिक बाजारात अस्थिरता निर्माण झाली आहे. यामुळे कच्च्या तेलाच्या किमतीमध्ये एका दिवसात १० टक्क्यांनी वाढ झाली आहे. ३० मे रोजी कच्च्या तेलाचे दर ६२ डॉलर प्रतिबॅरल इतक्या खाली घसरले होते. मात्र, यात वाढ होत ते ७८ डॉलर प्रतिबॅरलवर पोहोचले आहेत. शेअर बाजारातही मोठी घसरण झाली आहे. शेअर बाजाराने गेल्या सहा महिन्यात गुंतवणूकदारांना शून्य टक्के रिटर्न्स दिले आहेत.

इराण जगातील तिसऱ्या क्रमांकाचा तेल उत्पादक देश आहे. शिवाय इराणचे भौगोलिक स्थानही अत्यंत महत्त्वाचे आहे. येथे 'स्ट्रेट ऑफ होर्मुज' ही एक जलवाहतूक मार्गिका आहे, जिथून सौदी अरेबिया, कुवेत, इराक यासारख्या देशांचा तेल पुरवठा होतो. जर इराणने हा मार्ग बंद केला, तर जगातील सुमारे २० टक्के तेल पुरवठा थांबू शकतो. यामुळे तेलाच्या किमतीत वाढ झाली आहे.

---

### दोन्ही इंजिने फेल, कॅप्टनने केले नदीवर लँडिंग

**नवी दिल्ली, दि. १४ :** विमानाने टेक–ऑफ केलं आणि काही मिनिटांतच अचानक पक्ष्यांचा थवा येऊन धडकला. विमानतळाकडे परत फिरण्याचा प्रयत्न अयशस्वी ठरणार असं लक्षात येताच पायलटनं चक्क विमान नदीत उतरवलं आणि आश्चर्यकारकरीत्या विमानातले सर्व १५५ लोक सुखरूप बचावले.

ही घटना घडली २००९ साली अमेरिकेच्या न्यू यॉर्क शहरात. हे अपघातग्रस्त विमान होतं यूएस एअरवेज फ्लाईट १५४९, न्यूयॉर्कच्या हडसन नदीत हे विमान उतरलं म्हणून या घटनेला 'मिरॅकल ऑन द हडसन' असंही म्हणतात. या अभूतपूर्व वॉटर लँडिंग केलेल्या विमानाचे कॅप्टन होते चेस्ली सलनबर्गर ऊर्फ सली.

तुम्ही कदाचित 'सली' नावाचा सिनेमा पाहिला असेल, टॉम हँक्स यांनी ज्या कॅप्टन सलीची भूमिका केली तो खराखुरा अमेरिकन पायलट होता. १५ जानेवारी २००९ ची ही घटना. न्यूयॉर्कच्या लग्वार्डिया एअरपोर्टवरून नॉर्थ कॅरोलिनाकडे निघालेल्या या विमानाने टेकऑफनंतर काही मिनिटांतच इमर्जन्सी लँडिंगकेले. उड्डाणानंतर दोन मिनिटांतच, पक्ष्यांचा एक थवा विमानाला आदळला आणि दोन्ही इंजिन फेल झाली.

---

# वनहक्क दाव्यांच्या मंजुरीला गती : ३५० हून अधिक प्रकरणे निकाली

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. १४ : राज्यात अनुसूचित जमाती आणि इतर पारंपरिक वनवासी (वनहक्कांची मान्यता) कायदा, २००६ अंतर्गत प्रलंबित असलेल्या वनहक्क दाव्यांना गती देण्यासाठी प्रशासनाने विशेष शिबिरांचे आयोजन करून ठोस पावले उचलली आहेत. शनिवारी फोंडा, धारबांदोडा, सत्तरी आणि केपे या चार तालुक्यांमध्ये एकाच दिवशी झालेल्या शिबिरांमध्ये ३५० हून अधिक प्रकरणांवर निर्णय घेण्यात आला. त्यामुळे वर्षानुवर्षे प्रतीक्षेत असलेल्या अर्जदारांना मोठा दिलासा मिळाला आहे.**

▶ फोंडा, धारबांदोडा, सत्तरी आणि केपेमध्ये विशेष शिबिरांचे आयोजन

▶ डिसेंबर २०२५ पर्यंत सर्व दावे निकाली काढणार



फोंडा तालुक्यातील उपजिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या दिवसभराच्या शिबिरात एकूण ६० अर्ज निकाली काढण्यात आले. याशिवाय १२९ अर्ज प्रक्रियेत असून, ६२ अर्ज मंजुरीसाठी सज्ज आहेत. फोंड्याचे उपविभागीय अधिकारी शुभम नाईक यांनी सांगितले की, फोंड्यात एकूण २५९ अर्ज दाखल असून, यातील बहुसंख्य अर्ज शिरोडा, गांजे, बेतोडा, कोनशे, निरंकाळ आणि उसगाव या गावांतील आहेत.

या शिबिरात दक्षिण गोव्याचे अतिरिक्त जिल्हाधिकारी, फोंड्याचे सहमामलतदार–१ राजेश साखळकर, आणि गटविकास अधिकारी अश्विन देसाई यांनी कार्यवाहीचे प्रत्यक्ष निरीक्षण केले. त्यांनी अर्जदारांशी संवाद साधून त्यांना आवश्यक कागदपत्रांची पूर्तता कशी करावी याचे मार्गदर्शन केले आणि विभागीय समन्वय ठेवल्याची खात्री केली.

दिवसभर अर्जदारांच्या जमिनीच्या नकाशांची पडताळणी, वंशावळीनुसार दस्तऐवज, शपथपत्रे, आणि अन्य पुराव्यांची बारकाईने तपासणी झाली. वन खात्याने सीमांकन प्रक्रिया, तर महसूल विभागाने सर्वेक्षण व मालकी हक्क संदर्भातील शंका स्पष्ट केल्या. अर्जातील त्रुटी दूर करण्यासाठी अर्जदारांना १५ दिवसांची मुदत देण्यात आली असून, त्या नंतरचे सर्व पात्र अर्ज जिल्हास्तरीय समितीकडे अंतिम निर्णयासाठी पाठवले जातील.

गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या अर्जांमध्ये आज झालेल्या गतीबद्दल अर्जदारांनी समाधान व्यक्त केले. अनेकांनी प्रशासनाच्या या थेट संपर्क आणि मार्गदर्शन उपक्रमाचे कौतुक केले. काहींनी स्पष्टपणे सांगितले की, पहिल्यांदाच आमच्याशी प्रत्यक्ष संवाद साधून अधिकारी आमच्या अडचणी ऐकून घेत आहेत.

सत्तरी तालुक्यातील उपजिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित शिबिरालाही ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सध्या सत्तरीत एकूण २,४०० वनहक्क दावे प्रलंबित आहेत. यापैकी ६५० अर्ज उपजिल्हाधिकारी कार्यालयात प्राप्त झाले असून, त्यांची तपासणी सुरू झाली आहे. या प्रक्रियेमध्ये अर्जातील त्रुटी दूर करून, आवश्यक दस्तऐवजांची पडताळणी करून पात्र अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठवले जातील.

उपजिल्हाधिकारी लक्ष्मीकांत कुट्टीकर यांनी सांगितले की, १८ जूनपर्यंत प्राथमिक छाननी पूर्ण केली जाईल. त्यानंतर पात्र अर्ज जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवले जातील. विशेष म्हणजे २१ जून रोजी सत्तरीतील सर्व ग्रामपंचायतींमध्ये विशेष ग्रामसभा घेण्यात येणार आहे, ज्यामध्ये अर्जदारांकडून प्रस्ताव सादर करून ग्रामसभेची मंजुरी आणि ठराव घेतले जातील. मंजूर अर्ज टप्प्याटप्प्याने निकाली काढून डिसेंबर २०२५ पूर्वी जमीन सनद देण्याचे लक्ष्य पान २ ▶

# तरुणाच्या आत्महत्येनंतर ऑनलाईन जुगाराविरोधात उपाययोजनांची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १४ :** फोंडा येथील १९ वर्षीय तरुणाने ऑनलाईन जुगारात झालेल्या मोठ्या आर्थिक नुकसानीनंतर आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना समोर आल्यानंतर गोव्यात डिजिटल व्यसनाविषयी नव्याने चिंता व्यक्त केली जात आहे. युवकांच्या वाढत्या ऑनलाइन जुगार व्यसनामुळे समाज, पालक, आणि सरकारी यंत्रणांसमोर गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.

कायदेशीर अहवालांनुसार, अनेक युवक ५ हजार रुपयांपासून सुरुवात करून दिवसाला ४० हजार रुपयांपर्यंत गमावत आहेत. स्मार्टफोनवर सहज उपलब्ध असलेल्या या ॲप्समुळे युवक आर्थिक गर्तेत अडकत आहेत.

गोवा पोलिसांच्या सायबर क्राईम सेलने यावर्षी आतापर्यंत ६१ बेकायदेशीर जुगार वेबसाईट्स ब्लॉक केल्या आहेत. हे प्लॅटफॉर्म्स तरुणांना मोठ्या प्रमाणावर आर्थिक फसवणुकीच्या गर्तेत लोटत आहेत. सायबर क्राइमचे एसपी राहुल गुप्ता यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, आयटी कायद्यांतर्गत कलमे वापरून ही कारवाई केली जात आहे. नागरिकांनी असे प्लॅटफॉर्म दिसल्यास त्वरित तक्रार करावी, असेही आवाहन त्यांनी केले.

गोवा राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे माजी अध्यक्ष पीटर एफ. बोर्जेस यांनी या प्रश्नावर शाश्वत उपायांची गरज अधोरेखित केली आहे. त्यांनी फक्त प्रतिबंध नव्हे तर योग्य वय पडताळणी यंत्रणा आणि पालक–शिक्षक सहभाग यावर भर दिला. पालकांनी मुलांचे स्क्रीन टाइम, खर्च, बँकिंग ॲप्सवरील प्रवेश यावर सतत लक्ष ठेवण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. बाह्य खेळ, कुटुंब सहली यांना प्रोत्साहन देणे ही देखील एक प्रभावी उपाययोजना असल्याचे ते म्हणाले.

या समस्येचे गांभीर्य एका पीडित कुटुंबाच्या अनुभवातून स्पष्ट होते. दक्षिण गोव्यातील एका आईने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले की, तिच्या मुलाने सुरुवातीला शिक्षणाच्या नावाखाली पैसे मागितले. परंतु नंतर त्याच्या खऱ्या भानगडींचा खुलासा झाला. त्याचे ऑनलाइन जुगारात वाढते व्यसन आणि त्यासाठी बाहेरील व्यक्तींकडून कर्ज घेणे यामुळे कुटुंबाला मोठ्या संकटाचा सामना करावा लागला. वेळेवर लक्ष दिल्यामुळे आत्महत्येपासून बचाव शक्य झाला.

दुसऱ्या प्रकरणात मडगावमधील एका तरुणाने शिक्षणासाठी बाहेर असताना जुगाराच्या आहारी गेल्याचे उघड झाले. पालकांनी सुरुवातीला विश्वास दाखवला, मात्र मागितलेली रक्कम वाढू लागल्यावर त्यांनी चौकशी केली आणि नंतर मुलाला व्यसनमुक्ती केंद्रात दाखल करावे लागले.

मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी यापूर्वी विधानसभेत ऑनलाईन जुगार नियंत्रित करण्याचे आव्हान कबूल केले होते.

पान २ ▶

# गोव्यात २३ परदेशी नागरिक बेकायदेशीररित्या वास्तव्यास

■ टीम दैनिक हेराल्ड

▶ सी–फॉर्म सादर न करणाऱ्या घरमालकांविरुद्ध कारवाई

**पणजी, दि. १४ :** परदेशी नागरिकांना भाडेकरू म्हणून निवास देताना कायद्यानुसार अनिवार्य असलेला 'सी–फॉर्म' सादर न केल्यामुळे गोवा पोलिसांनी घरमालकांविरुद्ध ६ गुन्हे दाखल केले आहेत. ही कारवाई जानेवारी २०२५ ते मे २०२५ या पाच महिन्यांच्या कालावधीत करण्यात आली.

गोवा पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, याच कालावधीत राज्यात २३ परदेशी नागरिक बेकायदेशीरपणे राहत असल्याचे उघड झाले असून त्यातील २१ उत्तर गोव्यात आणि २ दक्षिण गोव्यात होते. संबंधित कायद्याच्या तरतुदींनुसार या नागरिकांवर योग्य ती कारवाई सुरू करण्यात आली आहे.

सी–फॉर्म ही एक आवश्यक कायदेशीर प्रक्रिया आहे, जी १९४६ च्या परदेशी नागरिक कायदा आणि त्यासोबत लागू नियमांनुसार घरमालक, गेस्ट हाऊस चालक किंवा हॉटेल व्यवस्थापक यांना परदेशी नागरिक त्यांच्या घरात दाखल झाल्यानंतर २४ तासांच्या आत संबंधित अधिकाऱ्यांना माहिती देणे बंधनकारक करते.

ही माहिती देणे सुरक्षेच्या दृष्टिकोनातून अत्यंत आवश्यक आहे, कारण त्याद्वारे राज्यात राहणाऱ्या परदेशी नागरिकांची ओळख, हालचाल आणि वास्तव्य यांचा मागोवा घेणे शक्य होते. सी–फॉर्म नोंदविणे ही भारत सरकारने परदेशी नागरिकांच्या बाबतीत ठरवलेली महत्त्वाची प्रक्रिया आहे.

या तपासणीत हणजूण पोलिस ठाण्यात २ गुन्हे तर मांद्रे, म्हापसा, वेर्णा, कोलवा या पोलिस ठाण्यात प्रत्येकी एक गुन्हा नोंदवण्यात आला आहे. गोवा पोलिसांनी स्पष्ट केले की, या सर्व गुन्ह्यांमध्ये परदेशी नागरिकांना भाड्याने घरे देऊनही त्याबाबत अधिकृत माहिती न देणाऱ्या घरमालकांनी कायद्याचे उल्लंघन केले आहे आणि त्यांच्याविरुद्ध चौकशी सुरू असून योग्य ती दंडात्मक कारवाई केली जाईल.

गोवा पोलिसांनी राज्यातील सर्व घरमालक, हॉटेल चालक, गेस्ट हाऊस आणि रिअल इस्टेट मालमत्ता व्यवस्थापकांना पान २ ▶

# कॅश्यू बोर्डाची घोषणा; कृषी निर्यातीला गती देण्याचा सरकारचा निर्धार

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १४ :** मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी राज्यात कृषी विकासास चालना देण्यासाठी आणि कृषी निर्यातीचा विस्तार करण्याच्या उद्देशाने 'कॅश्यू बोर्ड' स्थापन करण्याची घोषणा केली. शनिवारी मंत्रालयातआयोजित करण्यात आलेल्या उच्चस्तरीय बैठकीत ही घोषणा करण्यात आली.

गोव्याची कृषी निर्यात क्षमता उघड करणे या विषयावर झालेल्या या बैठकीला 'अपेडा' (कृषी आणि प्रक्रिया केलेले अन्न उत्पादने निर्यात विकास प्राधिकरण) व जैविक भारत या संस्थांचा सहभाग होता.

मुख्यमंत्री म्हणाले की, गोवा एक नैसर्गिकरित्या सेंद्रिय राज्य म्हणून उभे राहत आहे. शेतीला गती देण्यासाठी आणि शेतकऱ्यांसाठी निर्याताचे नवीन दरवाजे उघडण्यासाठी समर्पित काजू मंडळाची स्थापना हे पुढचे महत्त्वाचे पाऊल आहे. यामुळे शाश्वत आणि समृद्ध भविष्यासाठी शेतकऱ्यांना दिशा मिळेल.

या बैठकीस कृषी मंत्री रवी नाईक, आमदार प्रेमेंद्र शेट, आमदार देविया राणे, मुख्य सचिव डॉ. व्ही. कंदिवेलू , कृषी संचालक संदीप फळदेसाई , अपेडा अध्यक्ष अभिषेक देव, सचिव (कृषी) अरुण कुमार, तसेच विविध क्षेत्रातील तज्ज्ञ उपस्थित होते.

गोव्याच्या १८ महत्त्वाच्या कृषी उत्पादनांच्या निर्यातीला चालना देणे, राष्ट्रीय सेंद्रिय उत्पादन कार्यक्रम अंतर्गत सेंद्रिय प्रमाणन आणि त्याचा शेतकऱ्यांना होणारा लाभ वाढवणे,२०२४–२५ साठी गोव्याच्या कृषी निर्यातीची क्षमता आणि नियोजन करणे ,

शेतकरी कल्याणासाठी उपाययोजना आणि योजनांची अंमलबजावणी करणे,

राज्यातील सेंद्रिय उत्पादन प्रमाणनाची सद्यस्थिती आणि वाढीची दिशा ठरवणे आणि

सेंद्रिय निर्यातीसाठी आगामी कार्यक्रमांमध्ये गोव्याचा सहभाग कसा वाढेल या दृष्टीने प्रयत्न करणे या विषयांवर या बैठकीत सखोल चर्चा झाली .

गोव्यात काजू हे पारंपरिक, आर्थिकदृष्ट्या महत्त्वाचे उत्पादन आहे. याच्या उत्पादनात वाढ, प्रक्रिया उद्योगांचा विकास आणि जागतिक बाजारपेठेत प्रवेश यासाठी स्वतंत्र काजू मंडळ' हे धोरणात्मक पाऊल ठरणार आहे. या मंडळामार्फत शेतकऱ्यांना प्रशिक्षण, प्रोत्साहन योजना, विपणन सल्ला, आणि निर्यातीसाठी सहाय्य मिळणार आहे. मुख्यमंत्री सावंत यांनी स्पष्ट केले की, गोवा हे नैसर्गिक सेंद्रिय राज्य आहे. त्यामुळे राज्यातील शेती आणि कृषी उत्पादनांच्या निर्यातीला प्रोत्साहन देण्याचे अनंत संधी उपलब्ध आहेत. शासन यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करेल.

# इराणकडून इस्रायलवर क्षेपणास्त्र हल्ला; इस्रायलचे प्रत्युत्तर सुरूच

## दोन्ही देशांत तणाव शिगेला | नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण : अमेरिकेचा इराणला इशारा

**तेहरान/तेल अवीव, दि. १४ :**

इस्रायलने इराणच्या अणु कार्यक्रमाशी संबंधित ठिकाणांवर केलेल्या हवाई हल्ल्याच्या प्रत्युत्तरादाखल इराणने शनिवारी सकाळी इस्रायलवर मोठ्या प्रमाणात क्षेपणास्त्र हल्ला चढवला. या हल्ल्यांमुळे इस्रायलच्या विविध भागांमध्ये सायरन वाजवले गेले असून, नागरिकांनी सुरक्षिततेसाठी बंकरमध्ये आश्रय घेतला.

इस्रायली आपत्कालीन सेवा मेगन डेव्हिड ॲडोम नुसार, आतापर्यंत या हल्लयांमध्ये किमान दोन जणांचा मृत्यू झाला असून, २१ जण जखमी झाले आहेत. त्यापैकी एकाची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे.

अनेक क्षेपणास्त्रे हवेतच निष्क्रिय करण्यात आली असली तरी इराणची काही क्षेपणास्त्रे उद्दिष्ट स्थळी आदळली आहेत . सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या छायाचित्रांमध्ये इस्रायलच्या निवासी भागात एक क्षेपणास्त्र रस्त्यावर कोसळलेले दिसत आहे. त्यात वाहनांचे आणि घरांचे मोठे नुकसान झाल्याचे स्पष्ट होते.



सुरक्षेच्या कारणास्तव, अधिकृत यंत्रणांनी क्षेपणास्त्र नेमके कुठे कोसळले याची माहिती अद्याप जाहीर केलेली नाही. यामुळे इराणला सामरिक फायदा होण्याची शक्यता असल्याने ही गोपनीयता राखली जात आहे. इस्रायली संरक्षण दल (आयडीएफ) ने म्हटले आहे की, ते इराणवरील हवाई हल्ले सुरूच ठेवणार आहेत.आयडीएफच्या हवाई दलाने तेहरानच्या दिशेने मार्ग मोकळा केला असून आगामी काही तासांत इराणमधील अधिक लक्ष्यांवर हल्ले करण्यात येणार असल्याचे संकेत दिले आहेत.आयडीएफ चीफ ऑफ स्टाफ लेफ्टनंट जनरल एयाल झमीर आणि हवाई दल प्रमुख मेजर जनरल तोमर बार यांनी संयुक्त निवेदनात सांगितले की, योजना अंतिम टप्प्यात असून, आमची लढाऊ विमाने तेहरानमधील ठिकाणांवर हल्ला करण्यास सज्ज आहेत.

या तणावाच्या पार्श्वभूमीवर संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेची विशेष बैठक शनिवारी बोलावण्यात आली होती. या बैठकीत चीनचे राजदूत फू काँग यांनी इस्रायलच्या कारवाईचा तीव्र निषेध करताना म्हटले की, इराणच्या सार्वभौमत्वाचे उल्लंघन झाल्यामुळे परिस्थिती आणखी बिघडू शकते आणि अणुकरारावर विपरीत परिणाम होऊ शकतो. संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांनी दोन्ही देशांना तणाव कमी करून शांततेचा मार्ग अवलंबण्याचे आवाहन केले. दरम्यान, इराणच्या सरकारी प्रसारमाध्यमांनी दिलेल्या माहितीनुसार, इराणने अमेरिका, ब्रिटन आणि फ्रान्सला इस्रायलला समर्थन देण्याविरुद्ध इशारा दिला आहे. जर कोणत्याही देशाने इस्रायलला थेट मदत केली, तर त्यांच्या लष्करी तळांना आणि नौदल जहाजांना लक्ष्य केले जाईल, असा स्पष्ट इशारा इराणकडून देण्यात आला आहे.

शहरांमध्ये शुक्रवार रात्रभर सायरनच्या आवाजाने नागरिकांची झोप उडाली होती. नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सुरक्षित आश्रयस्थळांचा शोध घेतला. बरेच लोक सरकारी बंकरमध्ये गेले तर काहींनी घराच्या तळमजल्यावर सुरक्षित ठिकाणी आसरा घेतला.

इस्रायलमधील विरोधी पक्षनेते यायर लापिड यांनी तीन नागरिकांच्या मृत्यूबद्दल शोक व्यक्त करत नागरिकांना होम फ्रंट कमांडच्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन केले. ही इस्रायलसाठी अत्यंत कठीण रात्र होती. पण आम्ही धाडसी आहोत आणि आमच्याकडे बलाढ्य सैन्य आहे, असे त्यांनी म्हटले. शुक्रवारी इस्रायलने इराणच्या अणु प्रकल्पांवर हवाई हल्ले चढवले होते, ज्यात इराणच्या सहा अणुशास्त्रज्ञांसह अनेक वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांचा मृत्यू झाला. संयुक्त राष्ट्रांतील इराणचे प्रतिनिधी म्हणतात की, या हल्ल्यांत ७८ नागरिकांचा मृत्यू झाला असून, ३२० पेक्षा अधिक जखमी आहेत. अमेरिकेचे माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला त्यांच्या अणु कार्यक्रमात तडजोड करण्याची मागणी केली असून, इशारा दिला आहे की अन्यथा इस्रायल आणखी तीव्र हल्ले करू शकतो. आंतरराष्ट्रीय समुदायाने या परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले आहे. पश्चिम आशियातील तणाव अधिक वाढण्याची शक्यता लक्षात घेता, सध्या शांततेसाठी प्रयत्न आवश्यक असल्याचे राजनैतिक निरीक्षकांचे मत आहे.